# 'मृद्गंध' हुंगताना....

● प्रल्हाद वडेर

**श्री**मती इंदिरा संतांच्या 'मृद्गंधां'चा वेगळेपणा 'रविवारचा सकाळ' मध्ये त्यातील पहिल्या पाच-सहा लेखातच जाणवला. एक म्हणजे त्यातील कमालीचा साधेपणा. त्यात कुठलीही 'पोज' नव्हती, की भाषेचा नखरेलबाज नव्हता. बालपणापासून आतापर्यंत मनात भरून राहिलेल्या व्यक्ती, प्रसंग, अनुभव यांचा 'मृद्गंध' मनात जो साठून राहिलेला होता तो या स्फुट ललितलेखातून अतिशय सहजपणे व्यक्त होत होता. त्यात गंध होते ते त्या त्या अनुभवाचे आणि रंग होते ते इंदिराबाईंच्या समृद्ध व्यक्तिमत्वाचे. म्हणूनच तो रसिकांना खोल हुंगावासा वाटला.

## समृद्ध व्यक्तिमत्व :

इंदिराबाईंच्या कवितेपेक्षा हे ललितलेख मुळातच वेगळ्या प्रकृतीचे आहेत. कवितेत भूतकाळातील अनुभव वर्तमानकाळात जिवंत करण्याचा प्रयत्न होता; अपार्थिव अनुभवांना पार्थिव स्वरूप देण्याचा होता. जे आता अस्तित्वात नाही त्याला अस्तित्व देऊन त्याला दिवास्वप्नात रंगण्याचा होता. या ललितलेखांत मात्र जुन्या आठवणींचे रंगीबेरंगी काचेचे लोलक हातात घेऊन चाळवण्याचा चाळा आहे. त्यात जुन्या गडप झालेल्या संस्कृतीबद्दल एक खंत आहे. एक प्रकारच्या 'नॉस्टॉल्जिया' आहे. त्याचबरोबर जे एकेकाळी घडले ते अनुभवण्याचा प्रयत्न आहे. त्या व्यक्ती आणि ते प्रसंग पुन्हा अनुभवताना काही वेळा काहीसा वृत्तीतला हळवेपणा त्यात येतो यात शंका नाही. पण त्याचबरोबर एक तटस्थपणाही आहे; पुरेशी कला-



त्मकता आहे. असे वाटते की इंदिराबाई दुसऱ्या एका इंदिराबाईने कधी तरी एकदा भोगलेले, अनुभवलेले पुन्हा एकदा न्याहाळून पहात आहेत... ते पाहून कधी सुखावत आहेत, कधी दुखावत आहेत. कधी हर्ष तर कधी दुःख, कधी कृतज्ञता तर कधी तिटकारा त्यांच्या मनात दाटून येताना दिसतो. पण आता त्या मनात कडवटपणा मात्र साचून राहिलेला नाही. हे सगळे अनुभव एका भूतकाळाचे भाग झालेले आहेत, याची जाणीव त्या मनाला आहे. त्यातून एका ग्रामीण संस्कृतीचे, लोकजीवनाचे जसे प्रसन्न दर्शन घडते, तसेच कोरड्या अलिप्त शहरी संस्कृतीचेही. आणि सर्वात इंदिराबाईंचे समृद्ध व्यक्तिमत्व या सर्व अनुभवामागे उभे राहिल्याचे जाणवते.

## नाना प्रकारचे वास :

इंदिराबाईंचे हे व्यक्तिमत्त्व त्यांच्या पहिल्या 'गंध गाभारा' या लेखापासूनच जाणवू लागते. निपाणीजवळच्या तवंदीसारख्या एका छोट्याशा खेडेगांवातील दैनंदिन जीवनात हे गंध आणि वास किती प्रकारचे असू शकतात याचे नवल वाटते. फुलांचे वास, फळांचे वास, फिनेल, स्पिरिट, सेंट, ताजा पेपर यांच्या वासापासून जेवणानंतर हाताला येणारा वास, जुन्या वस्त्रांचा वास, गर्द रानातील उभ्या पिकांतून ये जाताना येणारा पाल्यांचा वास, भुईमुगाचे ओले वेल उपटल्यावरचा येणारा दुधाळ उग्र वास, तुरीच्या शेंगांच्या घोसांचा, तुरकाटयाच्या जळणावर तापविलेल्या दुधाचा वा चहाचा वास असे किती तऱ्हेचे वास त्यांच्या मनात भरून ठेवलेले आहेत.

त्याचबरोबर गाई, म्हशी, बैल, घोडे, वासरे यांच्याशी संबंधित वैरणीचे व इतर वास हे तर आहेतच. पण स्वयंपाकघरातील आईच्या ओचेपदराला बिलगल्यावर हिरव्या मसाल्याचा वास असतो तसा तवंदी गावालाच असलेला एक छान वास, गावात शिरतानाच तापलेल्या कोमट अशा डोंगरातील निघड दगड मातीवरून येणाऱ्या झळांचा वासही लेखिकेला येतो. असा तिच्या मनात संवेदनांचा एक सरकमंच आहे. अशक्त मूल रांगत यावे तसा शहरात पाऊस येतो. डांबरी, सिमेंटच्या गच्च्या ओल्या करतो आणि खिडकीतून वास येतो— मातीचा. तो आला की, तवंदीतील शेतांचा सरकमंच पुढे येतो. विजेप्रमाणे साट साट पावसाचे थेंब आल्यावर काळ्याभोर मातीतून उठलेला तो वाफाळा... आणि वास. घम् घम् – किती किती घ्यावा असे तिला होते. तो असतो फक्त मृद्गंध एखाद्या विशुद्ध भावकवितेसारखा. हा उत्सव चार दोन क्षणच लुटता येतो. पण त्यासाठी जी वाट पाहिली जाते ती धन्य होते.

## ग्रामीण संस्कृतीचे दर्शन :

'मृद्गंधा'मध्ये असे रसिकांना धन्य धन्य वाटण्याचे अनेक क्षण आहेत. त्यातील ग्रामीण संस्कृतीचे घडणारे दर्शन विलोभनीय आहे. त्यावेळच्या संबंध जीवनाला एक लय आणि ताल आहे. पहाटेच्या भूपाळीपासून त्याची सुरुवात होते. त्यात नागपंचमी, दसरा, दिवाळी, पोळा यांना महत्वाचं स्थान आहे. नागपंचमीबरोबर झोपाळा येतोच. या झोपाळ्याची आयुष्यभर साथ झाली तरी खरा झोपाळा नागपंचमीचाच. सगळी नाती, मानापानाच्या कल्पना, सासू-सुनेचे एरवीचे नाते आपल्या दोऱ्यांनी गुंडाळून टाकण्याची किमया हा पंचमीचा झोपाळाच करतो. या झोपाळ्याबरोबर, दळणं, कांडणं या दैनंदिन व्यवहाराशी सांगड घातलेल्या ओव्या आणि त्यातून लोकजीवनाचे साकार होणारे अम्लान इंद्रवलय, स्त्रियांच्या हालचालींचे होणारे उभे आडवे नर्तन, ताल, त्यांचे निरनिराळ्या लयीतील वळसेदार जोरकस स्वर, त्यांचे सावळे गोरे गोंडाळे हिरव्या गोंदळाचे हात, हिरव्या, डाळिंबी रंगांचे भरगच्च चुडे... ही रंगांची स्वराची तालाची वलये मनाभोवती झिलमिल वेढे घालीत राहणारी...

या सगळ्या ग्रामीण जीवनात पाणंदीची वाट आणि कौलारू घर यांनाही महत्वाचं स्थान आहे. गावच्या शिवेच्या जवळपास आपले स्वागत करणारी आणि उघड्या शिवाराशी नेऊन आपल्याला निरोप देणारी म्हणजे गाव आणि शिवार याना जोडणारी ही पाणंद. कौलाराचे नाजूक देखणे सुख जेवढे मनोहारी तितकाच त्या कौलारावर माकडांनी घातलेला धिंगाणाही कौतुकाचा आणि मनोरंजक. अशातच भूमिकन्याच वाटणारी पाऊलवाट तरी लेखिका कशी विसरू शकेल? तवंदी हे तर पाऊलवाटांचेच खेडेगाव. त्यातल्या पाऊलवाटा आठवता आठवता तिच्या मनात मनोमनीच्या पाऊलवाटा जाग्या होतात. आता त्या

सगळ्या नाहीशा झाल्या असल्या तरी अजून एक तरी पाऊलवाट जिथे माणूस पोहोचला नाही अशी उरली असेल असे तिला वाटते. ती म्हणजे पाखरांची आभाळातील पाऊलवाट! ती आपल्याला दिसत नाही म्हणून काल्पनिक. तरी पाखरांची घरट्याला जवळची वाट म्हणून असतेच. कातरवेळी एकटेच पाखरू आभाळात भिरभिरताना पाहिले की वाटते, अरण्यातील वाटांच्या गुंत्यासारखा तर तिथे गुंता नसेल? त्याचे ते काहूर इथून कळते की, 'आता कुठली वाट धरू?' असे लेखिकेला वाटते.

अशाच एका काल्पनिक पाऊलवाटेवरून लेखिका चालते आहे. महामार्ग, पथ सोडून पाऊलवाटेला लागले की तिला हायसे वाटते. कारण या पाऊलवाटेवर अवती भोवती निसर्गच निसर्ग पसरलेला असतो. जे जे आनंदाचे आणि रमणीयतेचे क्षण आजवर साठवले ते वाऱ्यात मिसळून तिला बिलगत राहतात. जीवनातले प्रेम, जिव्हाळा, स्नेह यांचा महुवा मनोमनी घमघमत राहतो. अन् याहून आणखी काय हवे असे धन्यतेचे उद्गार तिच्या तोंडून बाहेर पडतात. पाऊलवाटाप्रमाणेच धुके, आणि बांध हीही मनात पूर्णपणे आधारतात. धुके गूढरम्य बुवाजीसारखे, तर बांध माणसं जवळ आणणारे.

## सहवासाचे गहिरे क्षण

'मृदगंधा'त ना. मा. संत आणि इंदिरा संत यांच्या 'सहवासा'चे काही गहिरे क्षणही विलोभनीय आहेत. पुण्याला फर्गसनमध्ये गेल्यावर ना. मा. संतांची ओळख झाली. त्यानाही कविता करण्याचा नाद होता. आणि ते व्हायोलिनही सुंदर वाजवीत. वाङ्मयमंडळातर्फेच्या संग्रहात कविता केल्याच्या निमित्ताने काम थोडे आणि इतर गप्पा फार असं मग होऊ लागलं. एक दिवस प्रिन्सिपलसाहेबानी त्याना सुरेख इंग्रजीत खडसावलं अन् शेवटी म्हणाले, 'व्हॉय डोंच्यू तेक हर फॉर ए वॉक?' त्या वाक्यानं इंदिराबाईच्या मनात डोंब उसळला आणि 'झालं तेवढं पुरे नाही का झालं?' असं आठदहा दिवसानंतर आलेल्या संतांना त्यानी सुनावलं. प्रा. रा. श्री. जोगानी त्याना 'फिरायला निघाला? जा. जाऊन या.' असं सांगितलं. गॅलरीतून कुणी म्हटलं 'बक् अप्'.

असं ते पहिलं फिरणं. नंतर कधी टेकडयाच्या टोकावरून, उतारावरून बाभुळवनातून, कालव्यावरून मग फिरणंच फिरणं झालं. अन् एका तिन्हीसांजेला आवडल्या टेकडीवर, लाल पश्चिमेकडून ठळकपणे त्यांच्याकडं बघत असलेल्या त्या चांदणीच्या साक्षीनं त्यांनी एकमेकांचे जीवनसाथी होण्याचं ठरविलं.

पण त्या आधी एकदा गावातूनच वसतिगृहात संतांचे दोन ओळींचे त्याना पहिले पत्र आले. 'स. न. वि. वि.' ने सुरुवात होणारे : 'तुम्ही पुढील रविवारी आमच्या घरी याल का? कळवा. मी टांगा घेऊन येईन.'

काकांची भीती, कॉलेज शिक्षण बंद करतील म्हणून इंदिराबाईंनी उत्तर लिहिले, 'कॉलेजवर भेटतोच की आपण. घरी आणि कशाला?'

आणि रविवारी त्यांना संतांचे एका ओळीचे उत्तर आले :

'कॉलेजवर तरी कशाला?'

पंधरा दिवस सुने गेले आणि मग पुन्हा जमले.

## अश्रूत भिजवणारी तप्तमुद्रा

काकांची भीती खरीच होती. 'हे पत्र कुणाचं? हा कोण आहे मवाली?' ट्रंकेतले दोन दिवसापूर्वी आलेले पत्र त्यांना मिळाले होते. 'ते मवाली नाहीत. एम. ए. च्या पहिल्या वर्गात आहेत. आमची मैत्री झाली आहे,' असं सांगूनही न ऐकतां इंदिराबाईचा उजवा तळवा उचलून त्यांनी कंदिलाच्या माथ्यावर दाबला. आणि जाणवला तो दाह आणि ती करपल्याची जाणीव. आयुष्यातल्या एका अतिशय कोवळ्या, हळव्या अनुभवाची विटंबना झाली होती. मनाचा दाह त्या जखमेपेक्षा मोठा होता.

या तप्त मुद्रेच्या दोन आठवणी मनाला भिडतात. लग्नानंतर तप्त मुद्रेची गोष्ट गंमत म्हणून सांगितल्यावर संतांनी उजवा तळवा निरखून पाहिला आणि एकदम डोळ्यांशी धरला. त्यांच्या डोळ्यांतील पाण्याने तो ओला झाला होता. त्या तप्त मुद्रेचा गारवा असा त्यानी अनुभवला.

त्याच तप्त मुद्रेची दुसरी आठवण जितकी गोड तितकीच रसिकांचे मन ढवळून टाकणारी आहे. संतांच्या शेवटच्या आजारात अंग पुसताना त्यानी क्षीण हातानी इंदिराबाईंचा उजवा हात उचलून आपल्या ओंठावर टेकवला आणि ते मुलाला म्हणाले, 'अरे, आईच्या हाताला काटे आहेत का बघत होतो. टोचले ना मानेला' त्या अजाणालाही ते पटले आणि तो म्हणाला, 'तुझ्या हाताला काटे? बघू.'

हा त्या त्रिकूटाचा शेवटचा सुखसंवाद वाचताना मनात कुठंतरी गलबलून जातं, ढवळून येतं. इंदिराबाईंच्या एकाहून एक उत्कृष्ठ कविता आठवू लागतात.

सतत अश्रूत भिजविणारी अशी ही तप्तमुद्रा नोकरी करायला लागल्यावरही वाट्याला आली. शाळेतला पहिला पगार झाल्यावर तीस रुपये संतानी वडिलाकडं दिले आणि आपण दोन रुपये पासासाठी घेऊन तीन रुपये इंदिराबाईंच्या हातात ठेवले. शाळेत चहाच्या वर्गणीसाठी लागतात असं म्हटल्यावर 'शाळेत आणि चहा लागतो? तो का? सकाळी घेता, संध्याकाळी आल्यावर घेता. दुपारी परत. तीन तीनदा चहा लागतो तुम्हाला? चहाला पैसे नाही घ्यायचे!' संतांच्या वडिलांच्या शब्दांची ही तप्त मुद्रा मिळवतीच्या कोवळ्या अस्मितेवर प्रहार करून गेली.

डॉक्टरानी प्रकृतीसाठी मुंबई सोडा म्हटल्यावर आणि पुण्यात ते जमल्यावर कालपरवापर्यंत प्रकृतीची चार पावदा चौकशी करणारे प्रेमळ सासरे तापले. 'आत्ता निघून जा. पण बायकोच्या आजाराचं निमित्त सांगू नको. तुला वेगळं रहायचं आहे ना? आत्ता नीघ.' ते ताडकन् म्हणाले.

सासूबाईही अबोल झाल्या. निघण्याच्या दिवशी सासरे देवापुढं बसले होते. संतांनी नमस्कार करताच दोन चांदीच्या मूर्ती त्यांनी त्यांच्याकडं फेकल्या नि म्हणाले,

'विकायला उपयोगी पडतील. घेऊन जा.' लग्नात माहेरून आलेल्या अन्नपूर्णा आणि लंगडा बाळकृष्ण यांच्या त्या मूर्ती होत्या!

आणि हे त्यांच्या मनावर आलेलं मळभ निवळायला वर्ष लागलं.

आणखी एक गंमतीदार आठवण. आई काही खमंग करीत नाही म्हटल्यावर काकांनी स्वयंपाकघरात कोंडून घालून स्वयंपाक करण्याच्या दिलेल्या शिक्षेची आणि दुसरी स्वतः संतांनी पोळ्या करायला शिकविण्याची. त्यावेळी इंदिराबाई म्हणतात की 'किती चांगले आहात हो! मला वाटतं...'

'काय वाटतं ग?'

'वाटतं, तुमचे पाय घट्ट धरावेत.' आणि संत म्हणतात, 'एवढंच! मला वाटलं आणखी काही...'

आणि हे सगळं चार वर्षानंतर अचानक संपलं. नातेवाईक दुरावले.

'तिथे खुंटीवर पिशवीत नथूच्या अस्थी आहेत. त्यांचं काय करायचं असलं तर करा,' मामेसासरे घरातून जाताना म्हणाले आणि निघाले. टांग्यात बसेपर्यंत मुलांच्याकडं देखील कुणी मागं वळून पाहिलं नाही ते आतापर्यंत.

असे कुठे पूर्वग्रह, कुठे दुसऱ्यांचं कान भरणं, कुठे हेवादावा, कुठं मत्सर, कुठं जबाबदारी टाळण्याची वृत्ती अशा गोष्टींचे कारल्याच्या वेलाला खतपाणी मिळते आणि नातेवाईकांचे कारल्याचे मांडव तयार होतात. अशा या अनेक तप्त मुद्रानी 'मृदगंधा'तील विविध क्षण जिवंत झालेले आहेत.

'मृद्गंध'मधील व्यक्तिचित्रंही लक्ष्य वेधून घेतात. सवाई गंधर्व, बालगंधर्व, आनंद मांडवीचा राजहंस बा. भ. बोरकर, अण्णासाहेब कर्वे, हिराबाई बडोदेकर अशा कितीतरी व्यक्ती आणि त्यांच्या व्यक्तित्वाचे नेमके आणि मोजके दर्शन घडविणारे प्रसंग.

इंदिरा संतांचे 'मृद्गंध' असे हे त्यांच्या समृद्ध व्यक्तिमत्वाचे दर्शन घडविते. त्यात सर्वात त्यांचा सूर जुळतो तो निसर्गाशी. त्यात गोजिऱ्या पाखरांचा लळा आहे, हिरवे ऋणानुबंध आहेत आणि मलयगिरीची चंदनबाधाही.

'मृदगंधा'तील इंदिराबाईंचे व्यक्तिमत्त्व आहे ते अष्टमीच्या चांदण्यासारखे. त्यात पौर्णिमेचो भडक संपन्नता नाही, आणि अवसेच्या काळोखाची तीव्र अंधारकळाही. आनंद उदासीच्या, सुखदुःखाच्या विविध अनुभवांचे ते एक मनोज्ञ रसायन आहे. त्या त्या अमृतलाटा त्यांच्या सहवासाभोवती खेळत, हिंदकळत त्यांच्या स्वतःच्या तनामनाला स्पर्श करून जातात, तशाच त्या रसिक मनालाही.

-※-